महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.२३/पदभरती/का-४** **दि.१२-१०-२०२३**

## परिपत्रक क्र. १११

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील विविध शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील शिल्प निदेशक-१४५७ पदे भरण्याकरिता दिनांक १७/०८/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरात क्र.१/२०२२ च्या अनुषंगाने झालेली सामायिक परीक्षा (CBT-१) व व्यावसायिक चाचणी (CBT-२) यामध्ये २०० गुणांपैकी किमान ४५% (९०) गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांच्या **तात्पुरत्या गुणवत्ता याद्या (Provisional Merit List)** तसेच किमान ४५% (९०) गुण प्राप्त न केल्याने पदभरतीच्या पुढील टप्प्याकरिता **अपात्र ठरलेल्या (Not Eligible) उमेदवारांच्या याद्या** दिनांक ०६/१०/२०२३ रोजीच्या परिपत्रकांन्वये संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

सदर तात्पुरत्या गुणवत्ता याद्यांच्या अनुषंगाने उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने खालील बाबी संबंधित पात्र उमेदवारांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहेत.

१) सदर पदभरतीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या सामायिक परीक्षेत (CBT-१) उमेदवाराने Normalization-Mean Standard Deviation Method नुसार प्राप्त केलेले गुण व व्यावसायिक चाचणी (CBT-२) परीक्षेतील गुण यांच्या एकूण गुणांच्या आधारे तयार करण्यात आलेल्या तात्पुरत्या गुणवत्ता याद्या (Provisional Merit List) संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. सदर गुणवत्ता याद्यांमध्ये उमेदवाराच्या ऑनलाईन अर्जामधील Name, Gender, Category Parallel/Other Reservation, Date of Birth बाबतचा तपशिल दर्शविण्यात आलेला आहे. पदभरतीच्या टप्प्यांवरील गुणवत्ता यादी व निवड सूची या दोन्हीही स्वतंत्र बाबी आहेत.

२) खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरिता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्याबाबत महिला व बाल विकास विभागाने दिनांक ०४/०५/२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. सदर शासन निर्णयात परिच्छेद क्र.५ मध्ये "महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरात क्र.८३/२०२१ अन्वये झालेल्या भरती प्रक्रियेस तसेच या भरती प्रक्रियेचा निकाल ज्या दिनांकास प्रसिद्ध करण्यात आला, त्या दिनांकानंतर प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींअन्वये सुरु झालेल्या भरती प्रक्रियांना या शासन निर्णयातील तरतुदी लागू होतील." असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील विविध शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील शिल्प निदेशक-१४५७ पदे भरण्याकरिता दिनांक १७/०८/२०२२ रोजी जाहिरात क्र.१/२०२२ प्रसिद्ध करण्यात आलेली असल्याने महिला व बाल विकास विभागाच्या दिनांक ०४/०५/२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदी या पदभरतीस लागू होत नाहीत.

३) पदभरतीच्या अनुषंगाने पात्र उमेदवारांची निवड करतांना सामाजिक व समांतर आरक्षण संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, अधिनियम, शासन निर्णय, परिपत्रके यामधील तरतुदी तसेच सुधारणा नुसार निवड सूची तयार करण्याची कार्यवाही करण्यात येते.

४) मागास प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे उमेदवार वगळून) लागू करण्यात आलेले आरक्षण हे केवळ उन्नत व प्रगत गटात अंतर्भूत नसलेल्या व्यक्तिंनाच अनुज्ञेय आहे. एखादा उमेदवार (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे उमेदवार वगळून) मागास प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छित असेल तर सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले "उन्नत व प्रगत गट/ व्यक्ती यामध्ये मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र" सादर करणे आवश्यक राहील.

५) महिला आरक्षणाचा लाभ घेण्यास इच्छूक नसलेल्या महिलांना वगळून, उर्वरित सर्व महिला उमेदवारांच्या बाबतीत त्यांचे सामाजिक आरक्षण व गुणवत्तेनुसार, ज्या प्रवर्गातील पदासाठी निवडीस पात्र ठरत असतील, त्या प्रवर्गातून निवड होण्याकरिता लागू असलेल्या तरतूदीनुसार निवड करण्यात येईल.

तरी उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
( दि. अं. दळवी )
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.